मोहरी

प्रस्तावना

सरसू आणि मोहरी भारतात ३८-७९ लाख हेक्टर क्षेत्रावर घेतली जाते. त्यापासून २६.४१ लाख मेट्रीक टन उत्पादन मिळते आणि सरासरी उत्पादन ६८१ किलो प्रति हेक्टर मिळते. हे पीक प्रामुख्याने उत्तर भारतात घेतात. महाराष्ट्रात हे पीक अत्यल्प प्रमाणात घेतात. १९८८-८९ मध्ये महाराष्ट्रात या पिकाखाली ४८०० हेक्टर क्षेत्र होते. त्यापासून १२०० टन उत्पादन मिळाले आणि सरासरी उत्पादन २५० किलो प्रति हेक्टर मिळाले. महाराष्ट्रात सरसू फारसे घेतले जात नाही. परंतु मोहरीचे पीक प्रामुख्याने विदर्भ व मराठवाडयात अल्प प्रमाणात घेतले जाते. भंडारा व गडचिरोली जिल्ह्यात भातानंतर हे पीक घेतात. इतर भागात ते गव्हात मिश्रपीक म्हणून घेतात. बागायतीखाली हे पीक चांगले येऊ शकते.

जमीन:- मध्यम ते खोल, चांगला निचरा होणारी जमीन निवडावी.

पूर्वमशागत:- एक नांगरणी व दोन वेळा वखरणी करुन जमीन तयार करावी.

सुधारित जाती:- विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रात घेतलेल्या प्रयोगात लवकर तयार होणारी सीता आणि मध्यम कालावधीची पुसा बोल्ड या जाती चांगले उत्पादन देत असल्याचे आढळून आले आहे. सीता ९० ते ९५ दिवसात तयार होते आणि १० ते १२ क्विंटल/हेक्टर उत्पादन देते. त्यामध्ये ३८ टक्के तेल आहे. पुसा बोल्ड १२५ ते १३० दिवसात तयार होते आणि १४ ते १५ क्विंटल/हेक्टर उत्पादन मिळते. त्यामध्ये ४० टक्के तेल आहे.

पेरणीची वेळ:- पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवडयात करावी. पूर्व विदर्भात भातानंतर जिरायती पिकाची शक्यतो लवकर (ऑक्टोबर मध्ये) पेरणी करावी.

बियाणे:- सलग पिकासाठी ५ किलो बियाणे प्रति हेक्टर वापरावे, पुसा बोल्डचे बियाणे हेक्टरी ६ किलो वापरावे. दोन ओळीतील अंतर ४५ सें.मी. व ओळीतील दोन रोपांतील अंतर १५ ते २० सें.मी. ठेवावे.

बीजप्रक्रिया:- पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम थायरम किंवा ३ ग्रॅम कार्बेंडेन्झीम चोळावे.

वरखते:- ५० किलो नत्र अधिक २५ किलो स्फुरद प्रति हेक्टर पेरणीचे वेळी पेरुन द्यावे. पीक बागायती घेतल्यास पेरणीचे वेळी ३० किलो नत्र व ३० किलो स्फुरद द्यावे आणि पेरणी नंतर ३० ते ३५ दिवसांनी ३० किलो नत्राचा दुसरा हप्ता द्यावा.

पिकास पाणी देणे:- बागायती पिकास ४ ते ६ वेळा पाणी द्यावे. उगवणीनंतरचे पाणी थोडे उशिराने (३ ते ४ आठवडयांनी) द्यावे. पीक फुलोयात व शेंगा भरत असताना १५ दिवसाचे अंतराने पाणी द्यावे.

मिश्रपीक:- ४ ते ६ ओळी गहू आणि २ ओळी मोहरी अशा पद्धतीने पीक घेतल्यास अधिक आर्थिक फायदा मिळतो.

आंतरमशागत:- जरुरीप्रमाणे १ ते २ निंदण्या (खुरपण्या) आणि दोन कोळपण्या कराव्यात आणि पीक तणविरहीत ठेवावे.

पीक संरक्षण:-

मर रोग व मूळ कुजव्या हे रोग रोपावस्थेत येऊ नयेत म्हणून थायरम ५ ग्रॅम किंवा बाविस्टीन ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. पिकावर पांढरा गेरवा, अल्टरनेरिया करपा आणि भुरी हे रोग येतात. पांढरा गेरवा व अल्टरनेरिया करपा या रोगाच्या बंदोबस्तासाठी ०.२५ टक्के मॅन्कोझेब भुकटी १२५० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावी. भुरी रोगाचे नियंत्रणासाठी ३०० मेशची गंधक पावडर २० किलो प्रति हेक्टर धुरळावी किंवा १ किलो पाण्यात विरघळणारी गंधक पावडर ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावी.

किडी:-

या पिकावर पडणारी मावा ही प्रमुख कीड आहे. त्याशिवाय काळी माशी या किडीचाही प्रादुर्भाव होतो. या किडींच्या बंदोबस्तासाठी एन्डोसल्फान ३५ टक्के प्रवाही १ लिटर किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही ५०० मि.लि. ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टर फवारावे. आवश्यकतेनुसार दुसरी फवारणी १५ दिवसाचे अंतराने करावी.

काढणी व मळणी:- शेंगा पिवळया पडू लागताच पीक तयार झाले असे समजावे. ते काढून एकत्रित गोळा करुन खळयात वाळवावे. नंतर ते झोडपून बी अलग करावे. काढणीस उशीर झाल्यास शेंगा फुटून बिया शेतात गळून पडतात. काढणी शक्यतो सकाळचे वेळी करावी.

उत्पादन:- जिरायतीखाली हळव्या जातीचे प्रति हेक्टरी ४-५ क्विंटल व निमगरव्या जातीचे ६ ते ८ क्विंटल उत्पादन मिळते. बागायतीखाली हळव्या जातीचे १० ते १२ व निमगरव्या जातीचे १४ व १६ क्विंटल उत्पादन प्रति हेक्टर मिळते.